# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

## मान्यताप्राप्त युनियन

बंधू-भगिनींनो,

आपणास माहित असेलच कि, ओएनजीसी व्यवस्थापनाने मागील काही महिन्यात टॉपमेन संदर्भात तसेच क्लास III व क्लास IV संदर्भात मान्यताप्राप्त युनियन्सना विश्वासात न घेता कामगारविरोधी ऑडर्स काढल्या. व सोबतच कॉन्ट्रक्ट पध्दतीने टॉपमन घेण्यासाठी अंतिम मंजूरी घेतली. या विरोधात कर्मचारी संघटनेनेच तात्काळ व्यवस्थापनाकडे लेखी नाराजी व्यक्त करुन व कोणत्याही परिस्थितीत कॉन्ट्रक्ट टॉपमनना रिगवर पाय ठेवू दणार नाही अशी जाहिर भुमिका घेतली. सदर ऑडर्सबाबत पुन:विचार करण्यासाठी मागणी केली. परंतू व्यवस्थापनाने त्याकडे जाणूनबूजून दुर्लक्ष केले. त्यामुळे कर्मचारी संघटनेने ऑफशोरला 24 तासाचा हंगर स्ट्राईक करण्याची नोटीस दिली व हा हंगर स्ट्राईक आपण सर्वांनी 100% यशस्वी केला. हंगर स्ट्राईक करण्याचा उद्‌देश व्यवस्थापनाला जाणिव करुन देण्याचा होता कि मान्यताप्राप्त युनियनना डावलून तूम्ही निर्णय घेवू शकत नाही. युनियनची श्रम कायद्याअंतर्गत नोंदणी केली असल्याने कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी लढण्यासाठी भारत सरकारने युनियनला काही अधिकार दिलेले आहेत. युनियनला डावलून व्यवस्थापन निर्णय घेवू शकत नाही. कर्मचारी संघटनेच्या हंगर स्ट्राईकची दखल घेवून व्यवस्थापनाने दि. 22 एप्रिल 2016 रोजी डेहराडून येथे मिटींग आयोजित केली. त्या मिटींगमध्ये ओएनजीसीच्या सर्व मान्यताप्राप्त युनियन्सतर्फे व्यवस्थापनाला बजावण्यात आले कि वरील तीनही ऑडर्स ताबडतोब मागे घ्याव्यात त्याचप्रमाणे एमओयु 2004 मधील क्लॉज 3 (IV) ची अंमलबजावणी तसेच त्यात सुधारणा, ज्युनि. असि. रीगमनची पोस्ट अबॉलीश करणे, करीअर ग्रोथ चॅनल ठरविणे, क्लास IV तसेच फिल्ड ऑपरेटर्स मधील जे कामगार रीगमन वा टॉपमन चे काम करतात त्यांना फिल्ड ऑपरेटर्स न ठेवता रीगमन वा टॉपमन पदी कायमस्वरुपी नियुक्ती करणे, 'एस' कॅडरसाठी एअर ट्रॅव्हल फॅसिलिटी तसेच क्लास III व क्लास IV साठी लॅपटॉप, डाटा कार्ड, कार ॲडव्हान्स व सीएमआरई बाबत सर्व मान्यताप्राप्त युनियनशी चर्चा करुन त्वरीत निर्णय घेण्यात यावा. यासाठी व्यवस्थापनाने दहा दिवसांची मुदत घेतली. त्यानंतर आजपर्यंत व्यवस्थापनाने युनियनला काहीच न कळविल्याने ओएनजीसीच्या सर्व मान्यताप्राप्त युनियन्सनी दि. 2 मे 2016 पासून व्यवस्थापनाच्या या धोरणाचा निषेध करुन पुढिल कार्यक्रम जाहिर केला. कर्मचारी संघटनेने सुध्दा मुंबई रीजनसाठी व्यवस्थापनाचा निषेध करण्यासाठी दि. 3 मे 2016 रोजी इलेवन हाय येथे 'निदर्शने' आयोजित केलेली आहेत व त्यानंतर दि. 4, 5 व 6 मे रोजी संपूर्ण रीग व प्लॅटफॉर्म वर "वर्क टू रुल" करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आलेला आहे.

मित्रांनो, व्यवस्थापन अशा प्रकारे जर मनमानी करुन एकतर्फी निर्णय घोषित करायला लागले तर भविष्यासाठी हे घातक आहे. कामगारांबाबत निर्णय घेताना व्यवस्थापनाने कामगारांच्या युनियनशी चर्चा करुनच ऑर्डर काढायला हवी. त्याचप्रमाणे व्यवस्थापन व युनियनने एकत्रितपणे विचार करुनच कामगारांच्या हिताचे निर्णय घ्यायला हवेत. त्यामुळे कर्मचारी संघटनेने भविष्याचा विचार करुन हा निषेध कार्यक्रम आयोजित केलेला आहे. व्यवस्थापनाला कामगारांच्या हिताचे निर्णय घ्यायला भाग पाडण्यासाठी व कायद्याअंतर्गत युनियनला असलेले अधिकार अबाधित ठेवण्यासाठी सदर कार्यक्रम यशस्वी करुन कर्मचारी संघटनेची ताकद व्यवस्थापनाला आपण सर्वजणांनी मिळून दाखवून द्यावी, हि विनंती.

**कर्मचारी संघटना झिंदाबाद !**
**कामगार एकता झिंदाबाद !!**

(प्रदीप मयेकर)
सरचिटणीस